# उपजिल्हा रुग्णालय कळंबणी ता.खेड जि.रत्नागिरी



| | | |
|---|---|---|
| वैद्यकिय अधिक्षक कार्यालय<br>दूरध्वनी क्र. –<br>कार्यालय फॅक्स क्र.– | ०२३५६-२६४५१० | उपजिल्हा रुग्णालय कळंबणी ता.खेड जि.रत्नागिरी<br>पिन कोड-४१५६१२<br>**Email :pokalambani@gmail.com** |
| आरोग्य सेवा. | | जा.क्र.उजिरुक/लेखा/दरपत्रकबाबत/ 970 /२५<br>दि. ०८/०९ /२०२५ |



## दरपत्रक सुचना

**विषय- सन २०२५-२६ करिता रक्त साठवणूक केंद्र करिता किट्स, साहित्य सोल्यूशन डिसपोजेबल सामग्री , इतर या स्थानिक खरेदी करण्याबाबत.**

सुचितकरणेत येते की, वैदयकिय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय कळंबणी ता.खेड ,जि.रत्नागिरी कार्यालय मार्फत सन २०२५-२६ मध्ये सोबत जोडलेल्या यादीतील बाबींची खरेदी करणे कामी दरपत्रके मागविण्याचे निश्चित केले आहे. त्या करीता सोबत जोडलेल्या यादीत **रक्त साठवणूक केंद्र करिता किट्स, साहित्य सर्जिकल साहित्य सोल्यूशन डिसपोजेबल सामग्री , इतर** यांची नाव निश्चित केली आहे. त्यासाठी स्थानिक पातळीवरून स्थानिक ठेकेदारांकडून दोन लिफाफा पद्धतीने सिलबंद लखोट्यामध्येवार्षिक दरपत्रके मागविण्यात येत आहेत. इच्छुकांनी दरपत्रके सादर यादीचे अवलोकन करावे.

तरी सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे आपले बाजार भावाचे ( सर्व करासहित ) दरपत्रक या कार्यालयाकडे दिनांक -१५-०९-२०२५ रोजी सायं. ०५:०० वाजेपर्यंत पोहोचेल या बेताने पाठवावे.

.......................................................................................................................................................

**लिफाफा १ ( तांत्रिक ) मध्ये पुढील कागदपत्र असणे आवश्यक आहे-**

१) अन्न व औषध प्रशासनविभागाकडील नोंदणी प्रमाणपत्र (Drug Licencs)

२) शॉप अॅक्ट लायसेंस / व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र झेरॉक्स प्रत .

३) जीएसटी प्रमाणपत्र झेरॉक्स प्रत किंवा प्रमाणपत्र नसल्यास लेखापरिषक ( CA ) यांनी प्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत

४) पॅन कार्ड झेरॉक्स प्रत

**लिफाफा २ ( आर्थिक ) मध्ये पुढील कागदपत्र असणे आवश्यक आहे-**

१) लिफाफा २ मध्ये सिलबंद दरपत्रक सादर करावे.

**दरपत्रके सादर करण्याच्या सर्वसाधारण अटी व शर्ती-**

१. इच्छुकांनी वरील लागणारे रक्त साठवणूक केंद्र करिता किट्स, / साधनसामुग्री / डिसपोजेबल दर स्वतंत्र दरपत्रके सिलबंद लिफाफा मध्ये सादर करावीत. प्रत्येक फर्मेल फक्त एक दरपत्रक देण्याची परवानगी आहे. तसेच दरपत्रके Authorized Distributors Manufactures,Wholesale Suppliers यांनी भरावयाची आहेत.

२. दरपत्रका सोबत अन्न व औषध प्रशासनविभागाकडील नोंदणी प्रमाणपत्र (Drug Licencs) सोबत जोडणे आवश्यक.

३.गी. एस.टि नं व व पॅनकार्ड

४. संस्था / दुकान उपकरणे उत्पादन / विक्रीविषयक नोंदणी दाखला

५. दरपत्रके पोहोच करणेचे ठिकाण वैदयकिय अधिक्षक,उपजिल्हा रुग्णालय, कळंबणी,खेड रत्नागिरी कार्यालयात कामकाजाच्या वेळेत ( सुट्टीवगळता) दि. १५/०९ /२०२५ (५.०० वाजेपर्यंत)

६. यादी मधील बाबी आवश्यकतेप्रमाणे खरेदी केली जातील.

Scanned with OKEN Scanner

७. सदरील खरेदी अत्यावश्यक असल्याने तात्काळ १५ दिवसात पुरवठाकरणे बंधनकारक राहील.मुदतीनंतर पुरवठा केल्यास प्रति आठवडा ०.५ टक्के वसूली करण्यात येईल..

८. दरपत्रक मंजूर झाल्यानंतर पुरवठा केलेल्या मालाच्या बिलामध्ये आपला Drug Liciennce no पैनकार्ड व गी. एस. टिन क्रमांक लिहावा. तसेच आयकर, व्यवसायकर इ. तसेच नियमानुसार जे शासकीय कर लागू असतील ते सर्वभरण्याची जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील.

९. मंजूर दरपत्रकामधील बाबींचा पुरवठा करणे आपणांस शक्य झाले नाही व त्यामुळे वाढीव दराने बाहेरुन खरेदी करावी लागली तर निविदेतील मंजूरदर व वाढीव दर या मधील फरकाची रक्कम आपल्या कडून वसूल करण्यात येईल.

१०. सदर दरपत्रकामधील बाबींचा पुरवठा हा हॉस्पिटलपर्यंत आणून पोहोच करावा.

११. सोबत जोडलेल्या यादीतील आपण पुरवू शकणा-यासर्जिकल सोल्यूशन डिसपोजेबल सामग्री , सिरप व ओइंटमेंट इतरयांचे दर देणे बंधनकारक आहे. तसेच दर MRP / DPCU पेक्षा जास्त असू नये तसेच औषधे व साहित्यांचादरा बाबत राज्य शासन / केंद शासनाचे सर्व शासननिर्णय व परिपत्रके पालन करण्याची सर्व जबाबदारी दरपत्रक धारकाची राहील.

१२. रक्त साठवणूक केंद्र करिता किट्स, / साधनसामुग्री / डिसपोजेबल खरेदी वेळी आवश्यक ती मात्रा गरजेनुसार खरेदी करण्यात येईल सर्व बाबी यादीनुसार खरेदीकरणे या कार्यालयावर बंधनकारक नाही आवश्यकतेनुसार खरेदी केली जातील.

१३. एखादे किट्स, / साधनसामुग्री / डिसपोजेबल अप्रमाणित अथवा खराब आढळल्यास त्या विषयी होणाया सर्व शासकीय कार्यवाहीची जबाबदारी दरपत्रकधाराची राहील. नवीन बदली करून दयावे लागल्यास तो पुरवठा विना शर्त व इतर खर्चाशिवाय पुरवठा करणे हे दरपत्रकधारकास बंधनकारक राहील.

१४. यादीमध्ये नमूद करण्यात आलेली औषधे / साधनसामग्री / डिसपोजेबल हे मागणीनुसार त्वरीत पुरवठा करण्यात यावीत. १ वर्षापेक्षा कमी प्रभावशून्यतेची साहित्य पुरवठा करूनयेत.

१५. निश्चित केलेल्या दराप्रमाणेच देयके तीन प्रती ए४ साईज मध्ये सादर करावीत

१६. पुरवठा केलेल्या औषधांची देयके अनुदानाच्या उपलब्धतेनुसार अदा केली जातील

१७. सदर रक्त साठवणूक केंद्र करिता किट्स, / साधनसामुग्री / डिसपोजेबल हे अत्यावश्यक सेवेसाठी लागणारी असून या रुग्णालयाने मागणी करताच तात्काळ पुरवठा करणे पुरवठादारस बंधनकारक राहील.

१८. दरपत्रके स्विकारण्याची मुदत नोटीस प्रसिध्दी दिनांकापासून दि.१५/०९/२०२५ (५.०० वाजेपर्यंत) नंतर उशिरा प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

१९.दरपत्रके उघडण्याची तारीख दि.१६/०९/२०२५ (स. १०.०० वा. ) किंवा या कार्यालयाकडील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत येईल.

२०. कोणतेही कारण न देता कोणतेही दरपत्रके स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा प्रक्रिया स्थगित ठेवण्याचा अधिकार वैदयकिय अधिक्षक,उपजिल्हा रुग्णालय, कळंबणी,खेड रत्नागिरी यांनी राखून ठेवला आहे. त्यासाठी कोणतेही तोंडी अथवा लेखी कारण दिले जाणार नाही अगर पत्रव्यवहार केला जाणार नाही. दरपत्रकाचा कालावधी **०७ महिने ३१मार्च २०२६ पर्यात** असेल.

आदेशावरुन

वैदयकिय अधिक्षक,
उपजिल्हा रुग्णालय कळंबणी
ता. खेड , जि.रत्नागिरी.

**<u>कार्यालयाचा पत्ता-</u>**

वैदयकिय अधिक्षक,उपजिल्हा रुग्णालय, कळंबणी,खेड रत्नागिरी यांचे कार्यालय ,

प्रत:- १) नोटीस बोर्ड
२) शासन संकेत स्थळ

Scanned with OKEN Scanner

दरपत्रका करीता रक्त साठवणूक केंद्र करिता किट्स, / साधनसामुग्री / डिसपोजेबल यांची यादी

**SUB-DISTRICT HOSPITAL KALAMBANI ,TAL-KHED DISTRICT-RATNAGIRI**

| SR.NO | NAME OF DRUGS | PKg |
|---|---|---|
| 1 | ANTI-SERA A,B & O | 1*3 |
| 2 | AHG ANTISERA | 1*1 |
| 3 | BOVINE ALBUMINE | 1*1 |
| 4 | LISS SOLUTION | 1*1 |
| 5 | GEL CARD | 1*1 |
| 6 | NEUTRAL CARD FOR CROSS MATCH | 1*1 |
| 7 | COOMB CARD IAT | 1*1 |
| 8 | BLOOD GROUPING GEL CARD | 1*1 |
| 9 | GLASS SLIDES | 1*1 |
| 10 | ANTI-SERA A,B & O | 1*3 |

Scanned with OKEN Scanner